प्रशासक ठराव क्र. १८० दिनांक ०७ /०६/२०२३

आरक्षण क्र.१२४ अ या जागेत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत दुर्बल घटकांतील व्यक्तींकरीता ६०६० घरे बांधणे कामी मंजूर निवीदा ठेकेदार मे.पीएसपी प्रोजेक्ट लि. यांनी करारानुसार मुदतीत काम न केल्याने, मनपाने उक्त ठेकेदारा विरुध्द करार रद्य करण्याची व सुरक्षा अनमात रक्कम जप्त करण्याची नोटीस दिली असता ठेकेदाराने विवाद निर्माण करुन मा.उच्च् न्यायलयात आरबिट्रेशन याचिका क्र.८९/२०२१ दाखल करुन लवाद नियुक्तीची मागणी केली आहे. मा.उच्चन्यायालयाच्या आदेशान्व्ये सदर प्रकरणी लवाद प्राधिकरण नियुक्ती करण्यात आले आहे आणि लवाद सुनावणी सुरु आहे.

महानगरपालिके तर्फे उक्त् लवाद प्रकरणी ॲड मनोज जे.भट, महापालिका पॅनेल वकील यांची नियुक्ती केली आहे. सदर लवाद प्रकरणी ॲड मनोज भट यांनी खलीलप्रमाणे वकील फी प्रस्ताव सादर केला आहे.

| अनु.क्र. | वर्णन | रक्कम |
|---|---|---|
| १ | लवाद प्रकरणी सुनावणीस उपस्थित राहणे. ( एकूण १० सुनावणी तारखा पर्यन्त) म्हणजे प्रति सुनावणी रु.२५,०००/- वकील फी. | २,५०,०००/- |
| २ | सल्ला-मसलत करणे, कॉन्फरन्स/बैठका घेणे आणि प्रतिज्ञापत्र प्रतिउत्तर आणि रिजॉईन्डर इ. करणे. | २,५०,०००/- |
| ३ | किरकोळ खर्च व लिपीकांचा खर्च | २५,०००/- |
| | **एकूण** | **५,७५,०००/-** |

उपरोक्त प्रस्ताविता नुसार या लवाद प्रकरणी ॲड मनोज जे.भट यांची वकील फी निश्चित करणे कामी विधी अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकारी, उपआयुक्त (विधी वि.) यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एससीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६जून,२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजय कुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४८१ नुसार मंजूरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

दिनांक ०७ ०६ /~~०४~~/२०२३.

टिप: —

१. किमान ५० टक्के रक्कम प्रथम सुनावणी पुर्वी मिळावी.

२. किरकोळ खर्च व लिपीकांचा खर्च स्वतंत्रपणे व वेळोवेळी त्याकरता होणारा प्रत्यक्ष खर्च मिळावा. त्यापैकी रुपये २५,०००/- रक्कम आगाऊ मिळावी.

४. अभावी बैठकी ऐवजी प्रत्यक्ष सुनावणी झाल्यास आणि ती सुनावणी मुंबई आणि ठाणे येथे झाल्यास प्रति सुनावणी रुपये २५,०००/- वकील फी राहिल. परंतु, सुनावणी मुंबई शहराबाहेर झाल्यास प्रति सुनावणी ५०,०००/- वकील फी आणि जाणे-येण्याचा व राहण्या खाण्याचा खर्च स्वतंत्र मिळावा.

अॅड. मनोज भट यांनी सादर केलेल्या वकील फी निश्चित करतांना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

- प्रस्तुत लवाद प्रकरणी वादी-प्रतिवादी यांचे कडून परस्पर विरोधी दावे (क्लेमस अॅण्ड कॉन्टर क्लेमस) सुमारे रु. २५ कोटी किंवा त्यापेक्षा अधिक रक्कमेचे केले जाण्याची शक्यता आहे आणि त्याबाबत लवाद प्रकरणी निर्णय होईल.
- सबब, लवाद प्रकरणात प्रचंड मोठया रक्कमेचे दावे-प्रतिदावे यांच्या अनुषंगने सविस्तर प्रतिउत्तर, रिजॉन्डर, साक्षी-पुरावा, मोठया प्रमाणात दस्तऐवज दाखल करावे लागणार आहेत. तसेच सविस्तर युक्तीवाद करावा लागत. त्यामुळे सर्वसाधारण प्रकरणात निश्चित केलेल्या वकील फी पेक्षा अधिक फी लागले हे वकीलांचे म्हणणे संयुक्तीक आहे.
- यापूर्वीच्या लवाद प्रकरणांत महानगरपालिकेनेअॅड.नारायण आर.बुबना यांना प्रति सुनावणी रुपये-२५,०००/- व इतर शुल्क निश्चित करुन अदा केलेले आहेत. पूर्वीचे प्रकरणी १० सुनावणी तारखांपेक्षा अधिक सुनावणी तारखा झालेल्या आहेत.

त्यामुळे, सदर लवाद प्रकरणी महानगरपालिकेची बाजू मांडणे कामी उपरोक्त तक्त्यात दर्शविले प्रमाणे अॅड मनोज जे.भट यांना वकील फी निश्चित करणेस विधी अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकारी, उपआयुक्त (विधी वि.) यांनी शिफारस केलेली आहे.

| अनु.क्र. | वर्णन | रक्कम |
|---|---|---|
| १ | लवाद प्रकरणी सुनावणीस उपस्थित राहणे. ( एकूण १० सुनावणी तारखा पर्यन्त) म्हणजे प्रति सुनावणी रु.२५,०००/- वकील फी. | २,५०,०००/- |
| २ | सल्ला-मसलत करणे, कॉन्फरन्स/बैठका घेणे आणि प्रतिज्ञापत्र प्रतिउत्तर आणि रिजॉईन्डर इ. करणे. | २,५०,०००/- |
| ३ | किरकोळ खर्च व लिपीकांचा खर्च | २५,०००/- |
| | **एकूण** | **५,७५,०००/-** |

सदर लवाद प्रकरणी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४८१ नुसार अॅड मनोज जे.भट यांना वरील तक्त्यात दर्शविले प्रमाणे वकील फी एकूण रक्कम **रुपये ५,२५,०००/- अक्षरी रुपये पाच लक्ष पंच्यात्तर हजार मात्र) (सर्व बाबीसह/ लमसम)** निश्चित करण्यांस मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या मान्यते करिता सविनय सादर.

## प्रस्तावना

**विषय – पी.एस.पी प्रॉजेक्ट लिमिटेड अहमदाबाद विरुध्द भि.नि.श.मनपा.**
**वकीलांची फी निश्चित करणे.**

**संदर्भ – १. जाक्र./भिनिशमनपा/विधी वि/८०/२०२३ दि. २९/०३/२०२३.**
**२. ॲड. मनोज भट यांचे दि. ३०/०३/२०२३ रोजीचे पत्र.**
**मंजूर टिपण.**

आरक्षण क्र.१२४ अ या जागेत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत दुर्बल घटकांतील व्यक्तींकरीता ६०६० घरे बांधणे कामी मंजूर निवीदा ठेंकेदार पीएसपी प्रोजेक्ट लि. यांनी करारानुसार मुदतीत काम न केल्याने, मनपाने उक्त ठेकेदारा विरुध्द करार रद्द करण्याची व सुरक्षा अनमात रक्कम जप्त करण्याची नोटीस दिली असता ठेकेदाराने विवाद निर्माण करुन मा.उच्च् न्यायलयात अरबिट्रेशन याचिका क्र.८९/२०२१ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने त्यामध्ये दिनांक २७ जानेवारी,२०२३ रोजी, त्री सदस्यीय लवाद प्राधिकारण नियुक्त करणेचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने -१) श्री.एस.आय.पटेल, निवृत्त सचिव, आर ॲण्ड बी डिपार्टमेंट, गुजरात राज्य २) श्री.एस.बी.तामसेकर, निवृत्त सचिव, सा.बां. वि., गुजरात राज्य , श्री.ए.बी.देसाई, मुख्य अभियंता, सरदार सरोवर प्रकल्प यांची लवाद प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. उक्त प्राधिकरणाने लवाद प्रक्रिया सुरु केली आहे.

प्रस्तुत लवाद प्रकरणी ॲड.मनोज भट व ॲड. श्री. रामचंद्र शंकर आपटे जेष्ठ विधीतज्ञ (सिरिअर कौन्सिल) यांना संदर्भ क्र. १ नुसार नियुक्ती आदेश देऊन त्यांना प्रकरणी वकील फी बाबत प्रस्ताव लेखी सादर करणेस कळविले होते.

परंतु,ॲड. रामचंद्र शंकर आपटे, जेष्ठ विधीतज्ञ यांनी सदर नियुक्ती बाबत सहमती दिली नाही. ॲड.मनोज भट यांनी संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये सहमती कळवून वकील फीच्या बाबत संदर्भ क्र.२ पत्रान्वये लेखी प्रस्ताव सादर केला आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, लवाद प्रकरणी मोठया रक्कमेचे दावे-प्रतिदावे (क्लेमस ॲण्ड कॉन्टर क्लेमस) होत असतात आणि यामध्ये विस्तुतपणे बाजू मांडून विशेष प्रयत्न व जास्त काम करावे लागते. सबब, सर्वसाधारण प्रकरणात निश्चित केलेली रु.१७,०००/- फी पुरेशी नाही. सदर लवाद प्रकरणी त्यांनी खालील प्रमाणे वकील फीची मागणी केलेले आहे.

| अनु.क्र. | वर्णन | रक्कम |
|---|---|---|
| १ | लवाद प्रकरणी सुनावणीस उपस्थित राहणे. ( एकूण १० सुनावणी तारखा पर्यन्त) म्हणजे प्रति सुनावणी रु.२५,०००/- वकील फी. | २,५०,०००/- |
| २ | सल्ला-मसलत करणे, कॉन्फरन्स/बैठका घेणे आणि प्रतिज्ञापत्र प्रतिउत्तर आणि रिजॉईन्डर इ. करणे. | २,५०,०००/- |
| ३ | किरकोळ खर्च व लिपीकांचा खर्च | २५,०००/- |
| | **एकूण** | **५,७५,०००/-** |

या तक्त्याखाली त्यानी खालील टिप नमूद केली आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
पाणी पुरवठा विभाग

**विषय:- प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामाच्या ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.**

भिवंडी शहरात स्टेम प्राधिकरण यांचेकडून ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ४० द.ल.लि. तसेच मनपाचे वऱ्हाळा तलावमधून ५ द.ल.लि. असा एकुण ११८ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. लोकसंख्येच्या मानाने पाण्याची गरज १५० द.ल.लि प्रतिदिन इतकी असतांना प्रत्यक्षात मंजूर कोटा ११८ द.ल.लि प्रतिदिन आहे. शहरामध्ये ३२ द.ल.लि प्रतिदिन पाणी पुरवठा कमी पडत असल्यामूळे शहरात पाणी टंचाई भासत आहे.

त्यामूळे पाणी टंचाईग्रस्त भागात बोअरवेलव्दारे नागरीकांची पाण्याची गरज भागवीली जाते. प्रभाग समिती क्र.१ ते ५ दरम्यान १०३९ हातपंप,१००३ सबमर्सिबल व जेट पंप ५२ असे एकुण २०९४ बोअरवेल आहेत. सदर बोअरवेल वारंवार किरकोळ दुरुस्तीमूळे नादुरुस्त होत असतात.त्यामूळे या परीसरातील मा.सन्मा.नगरसेवक /नगरसेविका,पदाधिकारी व नागरीक यांचे दुरध्वनी,भ्रमणध्वनी व लेखी स्वरुपात दैनंदिन तक्रारी प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये प्राप्त होत असतात येणाऱ्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्याचे दैनंदिन काम करावे लागते.

भिवंडी महानगरपालिकेतील प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेकरीता रु.१,०१,६२,४८३/- मात्र कामास प्रशासकीय आर्थीक,तांत्रिक व ई निविदेस मान्यता मिळाली असून सदर कामाची ई निविदा सुचना क्र.०५/२०२३-२४ महाटेंडर संकेत,दैनिक वृत्तपत्रात स्थळावर दिनांक १२/०४/२०२३ ते २६/०४/२०२३ रोजी पर्यंत पहिल्यांदा प्रसिध्द केली होती. ई निविदेतील टेक्नीकल बिड दिनांक ०२/०५/२०२३ रोजी निविदा समिती समक्ष उघडले असता एकुण ४ निविदा आहेत. निविदेतील कागदपत्रांची छाननी करून, प्राप्त ४ निविदाकारांपैकी २ निविदाकारांचे नोटीसमधील नमूद अटी शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यामूळे अपात्र असून खालील नमूद दोन निविदाकार पात्र असल्याने सदर कामाची प्राईज बीड दिनांक २२/०५/२०२३ रोजी उघडण्यात आलेली आहे. त्यांचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१) मे बरकत कॉन्ट्राक्टर — अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी दराने (**रु.१,०१,११,६७१/-**)
२) मे.बालाजी ट्रान्सपोर्ट- अंदाजपत्रकीय दराने (**रु.१,०१,६२,४८३**)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवे निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामाच्य ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.** | रु.८७,३२,८५८/- |

सदर कामाची ई निविदा कालावधी व दर मान्यता प्रक्रियाकरीता कालावधी लागणार असल्याने उपरोक्त कामास सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मंजूर निविदेस **दि.०१/०४/२०२३ ते ३१/०५/२०२३ पर्यंत २ महिन्यांकरीता रु. १३,८५,७४१/- मात्र रकमेच्या मुदतवाढीस मान्यता मिळालेली आहे.**

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता **मे बरकत कॉन्ट्राक्टर** यांचे निविदेतील **दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी** असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव.

**ठराव क्रमाक** ७९७ **दिनांक** ७/८/२०२३

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिकेतील प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामाच्या ई निविदेतील कमी दरास मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

२/८ ६

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:-** **भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्ती कामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे व-हाळदेवी येथील जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज ५ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र असून या जलशुध्दीकरण केंद्रामधून भिवंडी शहरातील काही भागात दैनंदिन पाणी पुरवठा केला जातो. व-हाळा जलशुध्दीकरण केंदाची दैनंदिन देखभाल,निगा व दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरणांत होणारी पंपींग,व-हाळाजी.एस.आर.पातळीची तपासणी करणे करीता तीन शिफ्ट मध्ये कर्मचारी काम करीत आहेत. मनपा आस्थापनेवर व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल व निगा दुरुस्ती करीता मनूष्यबळ कमी असल्यामूळे सदर कामे करणेकरीता समस्या निर्माण होते. पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामूळे सदरची कामे करणेकरीता कंत्राटी कामगाराकडून कामे करुन घ्यावी लागत आहेत.

सन २०२३-२०२४ या आर्थीक वर्षाकरीता व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेकरीता रु २८,००,२५१/- मात्र कामास प्रशासकीय आर्थीक,तांत्रिक व ई निविदेस मान्यता मिळाली असून सदर कामाची ई निविदा सुचना क्र.०५/२०२३-२४ महाटेंडर संकेत,दैनिक वृत्तपत्रात स्थळावर दिनांक १२/०४/२०२३ ते २६/०४/२०२३ रोजी पर्यंत पहिल्यांदा प्रसिध्द केली होती. ई निविदेतील टेक्नीकल बिड दिनांक ०२/०५/२०२३ रोजी निविदा समिती समक्ष उघडले असता एकुण ६ निविदा आहेत. निविदेतील कागदपत्रांची छाननी करून, प्राप्त ६ निविदाकारांपैकी २ निविदाकारांचे नोटीसमधील नमूद अटी शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यामूळे अपात्र असून खालील नमूद दोन निविदाकार पात्र असल्याने सदर कामाची प्राईज बीड दिनांक २२/०५/२०२३ रोजी उघडण्यात आलेली आहे. त्यांचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**३)** मे बरकत कॉन्ट्राक्टर – अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी दराने (**रु.२७,८६,२४९/-**)

४) मे.बालाजी ट्रान्सपोर्ट- अंदाजपत्रकीय दराने (**रु २८,००,२५१**)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्ती कामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत.** | **रु.२२,४०,६९०/-** |

सदर कामाची ई निविदा कालावधी व दर मान्यता प्रक्रियाकरीता कालावधी लागणार असल्याने उपरोक्त कामास सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मंजूर निविदेस **दि.०१/०४/२०२३ ते ३१/०५/२०२३ पर्यंत २ महिन्यांकरीता रु. ५,४८,३०१/- मात्र रकमेच्या मुदतवाढीस मान्यता मिळालेली आहे.**

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता **मे बरकत कॉन्ट्राक्टर** यांचे निविदेतील **दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी** असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्ती कामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमाक** ९८२ **दिनांक** ०१/६/२०२३

भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा एका वर्षाच्या कालावधीकरीता पुरविणेबाबत कामाच्या ई निविदेतील कमी दरास मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ कामाच्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रफळ २६.०४ चौ.कि.मि.आहे. मनपाचे कार्यक्षेत्रात पाच प्रभाग समिती निहाय पाणी पुरवठयाचे दैनंदिन कामकाज चालते. प्रभाग समिती निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन किरकोळ दुरुस्तीकरीता नादुरुस्ती होत असतात, सदर तक्रारींचे निवारण वेळच्या वेळी तातडीने करावे लागते. सदरच्या दैनंदिन तक्रारीचे वेळेत निवारण करणेकामी सन्मा.माझी नसगरसेवक,नगरसेविका,पदाधिकारी तसेच नागरीकांच्या पाणी पुरवठा विषयी तक्रारी भ्रमणध्वनी व दुरध्वनीवरून प्राप्त होत असतात. आलेलया तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याकरीता पाईप लाईन निगा व दुरुस्तीने दैनंदिन काम करणे आवश्यक असल्याने सदरचे कामकाज वार्षीक ठेका पध्दतीने ठेकेदारामार्फत करून घेतले जाते.

सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील पाईप लाईन निगा व दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेकामी रु.१,२१,६२,६६२/- मात्र कामास प्रशासकीय आर्थीक,तांत्रिक व ई निविदेस मान्यता मिळाली असून सदर कामाची ई निविदा सुचना क्र.०५/२०२३-२४ महाटेंडर संकेत,दैनिक वृत्तपत्रात स्थळावर दि.१२/०४/२०२३ ते २६/०४/२०२३ रोजी पर्यंत पहिल्यांदा प्रसिध्द केली होती. ई निविदेतील टेक्नीकल बिड दि. ०२/०५/२०२३ रोजी निविदा समिती समक्ष उघडले असता एकुण ३ निविदा आहेत. निविदेतील कागदपत्रांची छाननी करून, प्राप्त ३ निविदाकारांपैकी १ निविदाकाराने नोटीसमधील नमूद अटी शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यामूळे अपात्र असून खालील नमूद दोन निविदाकार पात्र असल्याने सदर कामाची प्राईज बीड दि.२२/०५/२०२३ रोजी उघडण्यात आलेली आहे. त्यांचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**१) मे बरकत कॉन्ट्राक्टर — अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी दराने (रु.१,२१,०१,८४९/-)**
**२) मे.बालाजी ट्रान्सपोर्ट- अंदाजपत्रकीय दराने (रु १,२१,६२,६६२)**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ च्या निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत.** | **रु.१,०४,५०,२५७/-** |

सदर कामाची ई निविदा कालावधी व दर मान्यता करीता कालावधी लागणार असल्याने उपरोक्त कामास सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मंजूर निविदेस **दिनांक ०१/०४/२०२३ ते दि.३१/०५/२०२३ पर्यंत २ महिन्यांकरीता रु.१६,५९,८९१/- मात्र रकमेच्या मुदतवाढीस मान्यता मिळालेली आहे.**

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता **मे बरकत कॉन्ट्राक्टर** यांचे निविदेतील **दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०० टक्के कमी** असल्याने भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ च्या निविदेतील कमी दराला मान्यता मागविणेकामी प्रस्तावास मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमाक** १९३ **दिनांक** ७ / ६ /**२०२३**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात निहाय पाईप लाईन निगा दुरुस्ती एका वर्षाकरीता कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत सन २०२३-२०२४ करीता ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबत प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय पाईप लाईन निगा दुरुस्ती एका वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामाच्या ई निविदेतील कमी दरास मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत सन २०२३-२४.**

भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत होणारे नागरीकांमुळे नवीन रहिवाशी क्षेत्र मोठया प्रमाणात विकसीत होत आहे. त्यामुळे भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या व नव्याने विकसीत झालेले क्षेत्र विचारात घेता लोकसंख्येमुळे पाणी पुरवठयाचे झोन वाढलेले आहेत. शहरात अंदाजे ४१३ व्हॉल्व आहेत. एकात्मीक पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभामधील ७ जलकुंभ कार्यान्वीत करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ११० ते १२० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरात दैंनदिन पाणी पुरवठा वितरीत करणे करीता मनपाचे आस्थापनेवर व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहरात झोन निहाय वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीक यांचे भ्रमणध्वनीवरुन व दुरध्वनीवरुन तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे प्रशासनाला नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. सदर तक्रारीचे वेळच्या वेळी तातडीने निवारण करावे लागते. पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामुळे सदरचे काम करणेकरीता कंत्राटी कामगाराकडून कामे करुन घ्यावी लागत आहेत.

सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एक वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे कामी रुपये २,४४,०२,१८६/- मात्र कामास प्रशासकीय आर्थिक, तांत्रिक व ई निविदेस मान्यता मिळाली असून सदर कामाची ई निविदा सुचना क्र. ०६ दि.१३/०४/२०२३ ते दि.२७/०४/२०२३ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व नवराष्ट्र, नवभारत या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आली होती, दि.०२/०५/२०२३ रोजी ई निविदा,निविदा समिती समोर उघडली असता एकुण ४ निविदाकारांपैकी २ निविदाकारांचे निविदा नोटीस मधील नमूद अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यामुळे अपात्र असून खालील नमूद दोन निविदाकार पात्र असल्याने सदर कामाची प्राईज बीड दिनांक २२/०५/२०२३ रोजी उघडण्यात आलेली आहे. त्यांचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**१) मे. बरकत कॉन्ट्राक्टर – अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने (रु.२,४२,८०,१७५/-)**
**२) मे. बालाजी ट्रान्सपोर्ट – अंदाजपत्रकीय दराने (रु.२,४४,०२,१८६/-)**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एक वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत सन २०२३-२४.** | रु.२,१२,६४,२५५/- |

सदर कामाची ई निविदा दरांना मान्यता प्रक्रिया सुरु असल्याने कालावधी लागणार असल्याने उपरोक्त कामास सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मंजुर निविदेस **दि.०१/०३/२०२३ ते ३१/०५/२०२३ पर्यंत २ महिन्यांकरीता रु.३०,३१,०७५/- मात्र रक्कमेच्या मुदतवाढीस मान्यता मिळालेली आहे.**

**शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे**

**प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.**

सदर कामाकरीता **मे. बरकत कॉन्ट्राक्टर** यांचे निविदेतील दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी** असल्याने महानगरपालिकेस सदर कामाकरीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. १,२२,०११/- कमी देणे आहे. तरी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एक वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे सन २०२३-२४ च्या ई निविदेतील कमी दराला मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** १९४ **दिनांक :** ८ / ६ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एका वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ चे कार्यक्षेत्रात एक वर्षाकरीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेच्या निविदेतील दराला मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

२१८